# कुणी मज सांगेल का?

काय रेखिले मज भाग्यात
कुणी मज सांगेल का?
मनी रंगलेले स्वप्न माझे
साकार होईल का?...

नित्य पाहते सुंदर स्वप्ने
सोबत असती चंद्रतारे
अंगास झोंबती अवखळ वारे
पाहण्यास त्या स्वप्नांना
साथ, कुणी मज देईल का?
मनी रंगलेले स्वप्न माझे...

मधेच उठती वादळ वारे
उधळून जाती सारी स्वप्ने
नयनी जमती अश्रू सारे
पुसण्यास त्या अश्रूंना
साथ, कुणी मज देईल का...
मनी रंगलेले स्वप्न माझे...

देवास मी नित्य पूजिते
त्यास रोज मी हेच विनविते
धावून माझ्या मदती तू ये
साकारण्यास मज स्वप्नींना
साथ तू देशील का?...
मनी रंगलेले स्वप्न माझे

– पद्माकर चित्रे
('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)